दै. पुण्यनगरी दि. २१/११/२०२२



# सगरोळी खून प्रकरणातील आरोपी जेरबंद; स्थागुशाची कारवाई

पुण्यनगरी दि. २१/११/२०२२



**नांदेड/प्रतिनिधी**

बिलोली तालुक्यातील सगरोळी येथील अनोळखी इसमाच्या खुन प्रकरणातील आरोपीला जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले असून अनोळखी इसमाची ओळखही पटली आहे. स्थागुशाच्या पथकाने या प्रकरणी महेंदर नारायणा बोब्बासानी (३६, रा. झेंडा गल्ली, मिर्झापूर मंडळ नसरुल्लाबाद जि. कामारेड्डी) यास जेरबंद केले.

बिलोली तालुक्यातील सगरोळी शिवारात ८ नोव्हेंबर रोजी एका पुरुष जातीच्या इसमाचा अर्धवट जळालेला मृतदेह मिळून आला होता. या इसमाचा चेहरा जाळल्यामुळे त्याची ओळख पटली नव्हती. या प्रकरणी बिलोली पोलीस ठाण्यात गु.र.नं. २२३/२२ नुसार खुन करुन पुरावा नष्ट करण्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा शोध घेण्यासाठी स्थागुशाचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर तसेच इतर वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली होती. या गुन्ह्यातील आरोपीच्या शोधासाठी स्थागुशाने दोन पथके स्थापन करुन सीमावर्ती तेलंगणा व परिसरात आरोपीचा शोध घेतला. १९ नोव्हेंबर २०२२ रोजी पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांना तेलंगणा राज्यातील मिर्झापूर जि. कामारेड्डी येथील एका इसमाने हा खून केल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. या माहितीवरुन स्थागुशाच्या पथकाला पाठवून मिर्झापूर येथून महेंदर नारायणा बोब्बासानी यास महाराष्ट्र तेलंगाणा सीमेवरील कार्ला चेक पोस्ट येथून ताब्यात घेण्यात आले.

महेंदर यास खुनाबाबत विचारले असता त्याने गणेश व्यंकय्या चुंचू (रा. नसरुल्लाबाद जि. कामारेड्डी) यास त्याचे जवळ असलेली मोटार सायकल देत नसल्याचा राग मनात धरून खुन केला. महेंदरने गणेशला दारु पाजवून सगरोळी शिवारातील जंगलात नेऊन त्याच्या गळयावर ब्लेडने वार करुन तसेच डोक्यावर हेलमेटने मारले. व त्याच्या अंगावर पेट्रोल टाकून त्याला जिवंत जाळले. अशी कबूली दिल्याने पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी या आरोपीला पोलीस ठाणे बिलोली येथे हजर करण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, खंडेराव धरने, भोकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर, सपोनि पांडुरंग माने, पोउपनि सचिन सोनवणे, पोहेकॉ गुंडेराव करले, संजय केंद्रे, शंकर म्हेसनवाड, पोका देवा चव्हाण, महेश बडगु, मोतीराम पवार, तानाजी येळगे, बजरंग बोडके, रवी बाबर, राजू सिटीकर, दीपक ओढणे, अच्युत मोरे, चालक हेमंत बिचकेवार, दादाराव श्रीरामे यांनी ही कामगीरी केली.